**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील सखल भागांची यादी जाहीर**
- **नागरिकांनी पावसाळ्यात सतर्क राहण्याचे आवाहन**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील काही भाग भौगोलिकदृष्ट्या सखल स्वरूपाचे असल्यामुळे दरवर्षी पावसाळ्याच्या काळात या ठिकाणी जलजमावाची शक्यता निर्माण होते. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून अशा संभाव्य जलजमाव होणाऱ्या सखल भागांची यादी अद्ययावत करण्यात आली असून, ती महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.mbmc.gov.in) प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ सुमारे 79.2 चौ.कि.मी. असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य धोके ओळखून वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत. नागरिकांनीही पावसाळ्यात योग्य ती खबरदारी घ्यावी व अनावश्यक धोका पत्करू नये, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद अ. शर्मा (भा. प्र. से.) यांनी केले आहे.

महानगरपालिकेने नालेसफाई, जलनिकासी व्यवस्था, नियंत्रण कक्षाची पूर्वतयारी, आपत्कालीन पंपिंग यंत्रणा आदी विविध उपाययोजना केल्या असून, नागरिकांनीही सहकार्य करणे अत्यावश्यक आहे.

**पावसाळ्यात नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी:-**

**सखल व जलजमाव होणाऱ्या भागांमध्ये अनावश्यक प्रवास टाळावा.**

**वीज खांब, उघड्या विद्युत तारा आणि पाण्याने भरलेल्या परिसरांपासून दूर राहावे.**

**नाल्यांमध्ये, गटारांमध्ये प्लास्टिक व कचरा टाकणे टाळावे.**

**लहान मुले, वृद्ध, महिला यांची विशेष काळजी घ्यावी.**

**महानगरपालिकेच्या अधिकृत सोशल मीडिया हँडल्स आणि संकेतस्थळावरून माहिती घेत राहावी.**

संपर्क माहिती:

नियंत्रण कक्ष (24x7): [टोल फ्री क्रमांक / मोबाईल नंबर]- 1800224849

तक्रार निवारण- 1800220030

आपत्कालीन दूरध्वनी क्रमांक – 28117102 / 28117024 / 022-28117104

आपत्कालीन भ्रमणध्वनी क्रमांक - 8291370138 / 8670949715 / 8657047402.

संकेतस्थळ: www.mbmc.gov.in

ई-मेल: dm@mbmc.gov.in

महानगरपालिकेने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व आवश्यक पावले उचलली असून, पावसाळ्यात सजग व सावध राहणे ही प्रत्येक जबाबदार नागरिकाची जबाबदारी आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, फक्त अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळया दरम्यान पाणी साचणारे सखल ठिकाणाची यादी सन 2025

| अ.क्र. | सखल ठिकाणाचे नाव | अति संवेदनशिल ठिकाण होय / नाही |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र. 01/ 02 | | |
| 1 | उत्तन सी फुड मागे | होय |
| 2 | डोंगरी जामेरी आईस फॅक्ट्री | होय |
| 3 | पाली शांतीनगर परिसर | होय |
| 4 | मुर्धा शिवसेना शाखा मास्तर आळी, डबका अळी | होय |
| 5 | राई गाव बाबुभाई कंपाऊंड | होय |
| 6 | राई शिवनेरी नगर शेवटी | होय |
| 7 | राई मोर्वा मेन रोड | होय |
| 8 | बेकरी गल्ली | होय |
| 9 | शांतीनगर | होय |
| 10 | नरोना कंपाऊंड | होय |
| 11 | नाकोडा हॉस्पीटल | होय |
| 12 | सब —वे फाटक | होय |
| 13 | ठाकूर गल्ली | होय |
| 14 | भाजी मार्केट पोलीस स्टेशन | होय |
| 15 | कोंबडी गल्ली | होय |
| 16 | नवरंग गल्ली | होय |
| 17 | गीता नगर | होय |
| प्रभाग समिती क्र. 03 / 04 | | |
| 18 | खारीगाव जेसल धाम 02 ठिकाणी | होय |
| 19 | रुक्मिणी बिल्डिंग खारीगाव | होय |
| 20 | भाईंदर (पूर्व) जागृती अपार्टमेंट समोर (रेल्वे समांतर) | होय |
| 21 | गॅस गोडावून | होय |
| 22 | कस्तुरी इंडस्ट्रीज इस्टेट | होय |
| 23 | दत्तू म्हात्रे रोड | होय |
| 24 | काशिनगर साईचरण इमारत | होय |
| 25 | अश्विनी हॉस्पीटल गोडदेव नाका | होय |
| 26 | क्वीन्स पार्क रोड | होय |
| 27 | रामदेव पार्क राम अनुज | होय |
| 28 | ओमसागर रामनगर 02 ठिकाणी | होय |
| 29 | नवघर चाळघर | होय |
| 30 | शिर्डीनगर बाबाधाम बिल्डिंग परिसर | होय |
| 31 | भूषण निकेतन नवघर | होय |

| अ.क्र. | स्खल ठिकाणाचे नाव | अति संवेदनशिल ठिकाण होय / नाही |
|---|---|---|
| 32 | शेवंते चाळ गोडदेव गाव | होय |
| 33 | सिल्वर पार्क | होय |
| 34 | महेश इंडस्ट्रीज परिसर | होय |
| 35 | सुंदर नगर | होय |
| 36 | GCC CLUB रोड | होय |
| 37 | पुजा पार्क | होय |
| 38 | सिल्वर सरिता पोलिस स्टेशन | होय |
| 39 | गौरव संकल्प फेस 1,2, 4 | होय |
| 40 | ग्रिष्मा इन्क्लेव | होय |
| 41 | स्प्रिंग रोझ | होय |
| 42 | 22 नंबर बस स्टॉप | होय |
| 43 | सिल्वर ओक | होय |
| 44 | लक्ष्मी दर्शन | होय |
| 45 | सुंदर सागर | होय |
| **प्रभाग समिती क्र.** 05 | | |
| 46 | श्रीनाथ कॉमप्लेक्स संकुल | होय |
| 47 | कानुंगो इस्टेट गीतानगर फेस -4 | होय |
| 48 | शांतीनगर सेक्टर 04, 05,06, 11 | होय |
| 49 | पुनमसागर ख्रिश्चन कब्रस्तान | होय |
| 50 | शांतीपार्क फेस 3 ॲक्सीस बँक | होय |
| 51 | आर.एन.ए ब्रॉडवे गेट नं. 01, 02 | होय |
| 52 | शितलनगर कॉस्मोपॉलिटीन स्कुल | होय |
| 53 | मिरादर्शन | होय |
| 54 | शितलनगर शितल प्लाझा | होय |
| **प्रभाग समिती क्र.** 06 | | |
| 55 | कृष्णास्थळ संकुल | होय |
| 56 | अमिषपार्क संकुल | होय |
| 57 | संघवी टॉवर | होय |
| 58 | आत्माराम नगर पेणकरपाडा | होय |
| 59 | गोकुळधाम | होय |
| 60 | विजय पार्क | होय |
| 61 | पांडव इन्क्लेव | होय |
| 62 | लक्ष्मी बाग परिसर | होय |
| 63 | वेस्टन पार्क परिसर | होय |
| 64 | मीनाक्षी नगर परिसर | होय |
| 65 | ग्रीन व्हिलेज अग्रवाल | होय |
| 66 | जुबेर गली मुनशी कंपाऊंड | होय |
| 67 | ए.जी.नगर अमर पॅलेस | होय |
| 68 | मुनशी कंपाऊंड हिरल एक दंत | होय |

| अ.क्र. | सखल ठिकाणाचे नाव | अति संवेदनशिल ठिकाण होय / नाही |
|---|---|---|
| 69 | जया पार्क रोड ते प्रभाकर म्हात्रे कार्यालय पर्यंत | होय |
| 70 | सिद्धार्थ पॅकेजिंग कृष्णा पेपर्स सफारी हॉटेल बाजूला हायवे | होय |
| 71 | नयन सृष्टी पेनकर पाडा | होय |
| 72 | सिल्वर पार्क फायर ब्रिगेड ऑफिस समोर | होय |
| 73 | सिल्वर पार्क सिग्नल जवळ | होय |
| 74 | सुंदर सरोवर गेट समोर | होय |
| 75 | रश्मी उत्सव | होय |
| 76 | मन उपस बिल्डिंग 1 | होय |
| 77 | मीरा धाम | होय |
| 78 | हनुमान मंदिर मीरा गाव | होय |